MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## डीवायएसपी गोल्डेंकडून पत्रकाराना उध्दट वागणूक
## संतप्त पत्रकारांची पोलीस अधिक्षकांकडे तक्रार

बीड प्रतिनिधी – बीडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वांभर गोल्डे हे सातत्याने माध्यम प्रतिनिधी, पत्रकारांना अपमानास्पद आणि उध्ट वागणूक देत आहेत. वार्तांकन करतांना अडवाअडवी करणे, उट्ट बोलणे नेहमीचेच झाले आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आजच्या दौऱ्यातही पुन्हा याच गोष्टींची पुनरावृत्ती डीवायएसपी गोल्डे याच्याकडून झाली आहे सदरील प्रकाराविषयी सर्व पत्रकारांनी संताप व्यक्त करत पोलीस अधिक्षक यांच्याकडे तक्रार केली आहे.


या संदर्भात दुपारी उशिरा पत्रकारांनी अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांची भेट घेतली. डीवायएसपी गोल्डे यांच्याकडून यापुर्वीही अनेकदा असे प्रकार झालेले आहेत. जिल्ह्यातील माध्यमांनी कायम प्रशासन आणि पोलीसांना सहकार्याची भुमिका घेतलेली असतांनाही वरिष्ठ पोलीस अधिकारी अशा पध्दतीने वागणूक देत असतील तर ही बाब गंभीर असल्याचे पत्रकारांनी पोलीस अधिक्षकांना सांगितले. या संदर्भात दिलेल्या निवेदनावर संपादक, पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१३५ | गुरुवार दि.३० जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -135 | THURSDAY DT.30 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सुरेश धस नेता नाही तर खालचा कार्यकर्ता

## धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावरुन दादा गट अन् भाजपात वाजणार?





मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून आता हळू हळू अजित पवार आणि भाजपमध्ये भांड्याला भांडं लागतंय की काय अशी चिन्ह दिसताय. राजीनाम्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा काही संबंध नाही, अशी प्रतिक्रिया भाजप आमदार सुरेश धस यांनी दिली. त्यावर खालच्या कार्यकर्त्यावर बोलत नसल्याचं उत्तर अजित पवारांनी दिलंय. राजीनामा घेण्याच्या चर्चांदरम्यान, धनंजय मुंडे मंत्रालयात काल पाहायला मिळाले. यावेळी ते कॅज्युल पेहरावात असून त्यांचा राजीनामा घेतला जाणार नाही असा विश्वास त्यांना देण्यात आल्याचा त्यांच्या चेहऱ्यावर सांगत होता. दरम्यान, अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यानुसार, त्यांनी अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, मुंडेंच्या गैर व्यवहाराचे सर्व पुरावे दिलेत. त्यावर ती कागदपत्र घेऊन अजित पवार देवेंद्र फडणवीस यांना भेटतील असं आश्वासन दादांनी दिल्याचे दमानिया म्हणाले. तर दादांऐवजी फडणवीसांना धनंजय मुंडेच भेटल्याचे पाहायला मिळाले. या भेटीनंतर माझ्या राजीनाम्याच्या मागणीवर अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस उत्तर देतील असं स्पष्टपणे धनंजय मुंडे म्हणाले. बघा यासंदर्भातील स्पेशल रिपोर्ट

नामनिर्देशित सदस्य म्हणून नमिता मुंदडा विजेचे पंडितांची वर्णी सुरेश धस प्रकाश सोळंके यांचा पत्ता कट..

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये महायुती सरकारमध्ये आमदार असलेले प्रकाश सोळुंके सुरेश धस यांचा पत्ता नामनिर्देशित म्हणून केकच्या आमदार नमिता मुंदडा व गेवराईचे आमदार विजय असे पण त्यांची वनी लागली आहेत तर बीड जिल्ह्यामध्ये पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांना पालकमंत्री विरोध करणाऱ्या विरोध माहितीचे आमदार प्रकाश सोळुंके व सुरेश धस यांचे भर बैठकीमध्ये नाक कापले गेले की चर्चा बीड जिल्ह्यामध्ये चर्चेचा विषय बनला आहे धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांना पालकमंत्री पदाला विरोध केल्यामुळे सुरेश धस व प्रकाश सोळुंखे यांना मात्र गाडीची किंमत न दिल्याने मान खाली घालावी लागली की चर्चाही बीडमध्ये ऐकायला मिळत आहे आज झालेल्या डी पी टी सी बैठकीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये सुरेश धस प्रकाश सोळुंके यांना मात्र काडीची किंमत दिलेली नाही त्यामुळे आता राजकीय संघर्षाला वेगळं लागणार आहे. पक्षातील आमदार सुद्धा अजित पवारांनी आता बाजूला सारून धनंजय मुंडे यांना पसंती दिल्यामुळे बीड जिल्ह्यात धनंजय मुंडे ची बाजू व भविष्यात धनंजय मुंडे हे पालकमंत्री असतील तर धनंजय मुंडे आणि अजित दादा एकच नाण्याच्या बाजू असल्याचे बोलले जात आहे.

# जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत धनंजय मुंडेंनी मांडला ५ वर्षांचा हिशोब





बीड – बीड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षातील त्यांच्या चार वर्षाच्या पालकमंत्री कार्यकाळातील कामकाजाचा लेखाजोखा आज उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर बैठकीदरम्यान मांडला.

मागच्या पाच पैकी चार वर्षे मी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. त्यात साधारण दोन ते अडीच वर्षे ही कोविड मध्ये गेली. त्या काळात रुग्णांना तातडीचे योग्य उपचार मिळवून देणे तसेच लोकांचे प्राण वाचवणे आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करणे ही कामे प्राधान्याने करत कोविडच्या काळामध्ये जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करण्यात आले. अनेक कोविड सेंटर विविध वैद्यकीय साहित्य त्याचप्रमाणे रुग्णवाहिका अशा आरोग्य यंत्रणांना बळकटी देणाऱ्या बाबींवरती मोठ्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीचा निधी त्याकाळी खर्च केला गेला, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात दिली.

बीड जिल्ह्यात राबविलेला पिक विमा पॅटर्न, विमा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कंपनीच्या विरोधात फौजदारी खटला दाखल करणे, विविध नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देणे, अशी अनेक कामे केली. २०२४ सालचे अतिवृष्टी अनुदान मंजूर होऊन आलेले आहे, त्याचे वितरण लवकर पूर्ण केले जावे असेही धनंजय मुंडे म्हणाले.

याच काळात जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुमारे ११०० किमी रस्त्यांच्या विकासाचे काम पूर्ण झाले.

पंकजाताई मुंडे यांच्या पालकमंत्री कार्यकाळात मंजूर होऊन सुरू झालेले जिल्हा परिषद इमारत बांधकाम पूर्णत्वास गेले. पंकजाताई मुंडे यांचे पाच वर्ष व त्यापुढे मला मिळालेला ४ वर्षांचा कालावधी यात, आम्ही सर्वसमावेशक विकास साधण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

जिल्हाधिकारी कार्यालय बांधकाम सुरू आहे. मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू आहे. परळी ते बीड या महत्त्वाच्या रस्ता रुंदीकरणचे काम सुरू आहे. यांसह जिल्ह्यात न्यायलये, प्रशासकीय इमारती, विश्रामगृह, शासकीय रुग्णालयांच्या दर्जा उन्नती व बांधकाम असे अनेक महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांची कामे या काळात केली गेली तर अनेक कामे सध्या प्रगतीपथावर आहेत, कृषी भवन, महिला व बालविकास भवन, सीताफळ इस्टेट अशी अनेक मंजूर असलेली कामे आता दादांच्या नेतृत्वात पूर्णत्वास जातील, अशी अपेक्षा धनंजय मुंडेंनी व्यक्त केली.

बीड जिल्हा कुणबी प्रमाणपत्र देण्यात महाराष्ट्रात सर्वात आघाडीवर आहे, हेही धनंजय मुंडे यांनी नमूद केले.

बीड जिल्हा पोलिस दलास आवश्यक ७३ नवीन वाहने, ११३ मोटार सायकल या बाबी नियोजन समितीच्या माध्यमातून देण्यात आल्या. अशी अनेक सकारात्मक कामे करताना सर्व तालुक्यांना समान निधी देण्याचीही पुरेपूर काळजी घेण्यात आली, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी ऐकीव आणि अर्धवट माहितीच्या आधारे नियोजन समितीच्या कामकाजावर मागील काही दिवसात करण्यात आलेल्या निराधार आरोपांना देखील धनंजय मुंडे यांनी चोख प्रत्युत्तर दिले.

बीड जिल्हा सलोखा आणि बदनामी

दरम्यान बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून जातीयवादाचे विष काही लोकांकडून जाणीवपूर्वक पेरले जात आहे. याचा परिणाम जनतेपासून ते अगदी प्रशासनावर सुध्दा झालेला दिसून येत असून, जिल्हा प्रशासनात सुध्दा उभी फूट पडली आहे, हे नाकारता येणार नाही.

कोण कधी कुठल्या अधिकाऱ्याचे नाव आणि जात काढून काय आरोप करतील ते सांगता येत नाही, त्यामुळे शिपाई ते जिल्हाधिकारी सर्वच अधिकारी – कर्मचारी यांच्यावरती भीती व दडपणाचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत आपल्या पदांना व कामांना हे अधिकारी कसा न्याय देऊ शकतील, असा प्रश्न उपस्थित करत धनंजय मुंडे यांनी अधिकारी कर्मचारी यांची एक विशिष्ट रणनीती ठरवून त्यांना भयमुक्त वातावरण तयार करून देण्याबाबत तात्काळ ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले.

दरम्यान काही अफवा पसरवून, अर्धवट माहितीच्या आधारे मीडिया ट्रायल चालवून बीड जिल्ह्याची नको ती प्रतिमा बाहेर प्रसिद्ध केली जात असून, सबंध जिल्ह्याची नाहक बदनामी होत आहे. सामाजिक सलोखा अबाधित रहावा तसेच जिल्ह्याची बदनामी थांबावी, याबाबतही ठोस उपाययोजना करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी अजितदादा यांच्याकडे केली.

- सामाजिक सलोखा राखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज – धनंजय मुंडे
- जनतेपासून ते प्रशासन स्तरावर उभी फूट, अधिकारी–कर्मचाऱ्यांमध्ये भीती आणि दडपण, त्यांना भयमुक्त वातावरण दिल्यासच परिणामकारक काम दिसेल – मुंडेंची अजितदादांना विनंती
- उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक; धनंजय मुंडे यांनी मांडले महत्वाचे मुद्दे पंकजाताई व मी मिळून जिल्ह्याच्या सर्वसमावेशक विकासाला गती दिली
- ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या कामाला व वसतिगृह निर्मितीला गती द्या – धनंजय मुंडे यांची मागणी जिल्हा नियोजन समितीवरील आरोपांना मुंडेंचे चोख प्रत्युत्तर



# बीड जिल्हा वार्षिक योजना निधीतील परळी आणि अंबाजोगाई तालुक्यामध्ये ७३ कोटी ३६ लक्ष रुपयांची बोगस बिले उचलण्यात आली -आ.सुरेश धस

## धनंजय मुंडे यांच्यावर पत्रकार परिषदेतून केला घणाघात

आष्टी ( सुरेश कांबळे) बीड जिल्हा नियोजन समिती निधीतील सन २०२१-२०२२ या कालावधीमध्ये परळी आणि अंबाजोगाई तालुक्यांमध्ये रस्ता कामांवर ७३ कोटी ३६ लाख रुपयांची बोगस बिले काम न करता उचलण्यात आली आहेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बीडचे पालकमंत्री उपमुख्यमंत्री तथा नियोजन व वित्तमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे ही माहिती सुपूर्द करणार असून बीड जिल्ह्यातील विकास निधी वाटपामध्ये झालेला असमतोल दूर व्हावा आणि तात्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मतदारसंघातील हा बोगस बिलांचा घोटाळा असून त्याची चौकशी करण्याची मागणी आपण करणार आहोत असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.. आष्टी येथील निवासस्थानी आयोजित विशेष पत्रकार परिषदे मध्ये ते बोलत होते..

ते म्हणाले, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन-२०२१-२२ मध्ये परळी आणि अंबाजोगाई या तालुक्यातील बीड जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता रद्द केलेल्या ५७ कामांचे एकूण १४ कोटी ४३ लक्ष ४५ हजार रुपयांची बिले काम न करता काढण्यात आलेली आहेत त्याचबरोबर दि.३१/ १२/ २०२१ ते ३१/ ३/२०२२ या कालावधीमध्ये सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंबाजोगाई जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२ बीड, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई, या कार्यालयांतर्गत एकूण ३७ कोटी ७० लक्ष रू किमतीची बिले काम न करता उचलण्यात आली आहेत.. पुढे बोलतांना ते म्हणाले..

जिल्हा नियोजन समिती सन-२०२० मध्ये परळी आणि अंबाजोगाई या तालुक्यातील कामांची प्रशासकीय मान्यता तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी रद्द केली असूनही या सर्व कामांची बिले आपल्या मर्जीतील सार्वजनिक बांधकाम परळीचे उपअभियंता संजय मुंडे यांच्याकडे प्रभारी कार्यकारी अभियंता या पदाचा कार्यभार दि.२५ जून २०२२ रोजी सोपवून ३०/१२/२०२१ रोजीच्या २ कोटी २१ लक्ष दि.१८/३/२०२२ रोजीच्या १० कोटी ९८ लक्ष, दि.२५/३/२०२२ ६ कोटी ५९ लक्ष, दि.२६/३/२०२२



१६ कोटी ४८ लक्ष,तर दि.३१/३/२०२२ रोजीचे १कोटी ३४ लक्ष असे एकूण ३७ कोटी ७० लक्ष रूपायांचा घोटाळा तात्कालीन पालकमंत्री धनजंय मुंडे यांच्या मतदारसंघात झाला आहे.

ही माहिती आजच्या पहिल्यांदाच जिल्हानियोजन समितीची बैठक होणार असून त्यामध्ये पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सादर करणार असल्याचे आ.धस यांनी सांगितल्या त्याचबरोबर माझ्या घरातील सदस्यावर ट्रॉसिटी दाखल करण्याच्या प्रकरणी हे प्रकरण किरकोळ आहे असे खुळे नावाच्या महिला अधिकारी आहे.ज्यांना वाल्मिक अण्णांनी फोन केला होता.याचा मिडीयाने तपास करावं. असे आवाहन करून ते पुढे म्हणाले की संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे घरच्यांशी फारसा संबंध न ठेवणारा असून अनेक वेळा गुन्हे करून फरार होण्याची त्याची पद्धत आहे काही पोलीस कर्मचाऱ्यांकडून ही माहिती मला मिळाली आहे पोलीसांकडून माहिती घेतली.तो गरिब कुटुंबातील आहे आहे,त्यावर अनेक गुन्हे आहेत.सौरभ भोंडवे याचा बुडून मृत्यू झाला आहे परंतु त्याच्या वडिलांनी हा खून झालेला आहे अशी तक्रार देऊन देखील तत्कालीन पाटोदा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक केदार यांनी घेतलेली नाही कारण त्यांची नेमणूक आकाने केलेली होती त्यामुळे सौरभ भोंडवे यांच्या अकस्मान मृत्यू प्रकरणाची देखील चौकशीची मागणी आपण करणार आहोत असे सांगत सुरेश धस पुढे म्हणाले की सर्व बांधकाम विभाग अंबाजोगाई अंतर्गत रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०२१-२०२२ अंतर्गत जानेवारी २०२३ मध्ये कोणत्याही रस्त्यावर काम न करता

दि.१३/१२ /२०२१ रोजी ९ कामांचे १५ कोटी रुपये आणि दि.१८/२/२०२२ रोजी एक कामाचे १कोटी २० लाख रुपये असे एकुण १६ कोटी २० लक्ष रुपयांची बोगस बिले तत्कालीन कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांचे कालावधीमध्ये उचलण्यात आली आहेत त्याचबरोबर बजेट अर्थसंकल्पीय कामांमधील हायब्रीड न्यूटी अंतर्गत मंजूर असलेले आणि सध्या सुरू असलेले ५९ कोटी रुपयांचे रस्ता काम सुरू असून याच रस्ता कामावर ६ कोटी ३० लाख रुपयाचे आणखी एक काम मंजूर करून काम केल्याचे दाखवून परळी-पूस- बर्दापूर या रस्ता कामावर ५ कोटी रुपये काम न करता उचलण्यात आले आहेत हा प्रकार सार्वजनिक बांधकाम विभागाची क्षेत्रीय कार्यालयाचे तपासणी वेळी लक्षात येऊन त्यांनी या कामात द्विरुक्ती झाली म्हणजेच एक काम दोन वेळा मंजूर करून त्यातील पाच कोटी रुपयांची बिले उचलण्यात आले आहेत असे पत्र कक्षअधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय यांनी दि.१७/३/२०२२ रोजी दिले आहे

अशा प्रकारे बीड जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील एकूण ७३ कोटी ३६ लाख रुपयांचे रस्ते विशेषतः रस्ते कामांमध्ये बोगस बिले उचलण्यात आली आहेत ही सर्व कामे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील आहेत ही विशेष बाब आहे असेही आ.सुरेश धस यांनी सांगितले आणि या सर्व घोटाळ्याची चौकशी करावी अशी मागणी आपण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांच्याकडे करणार आहोत असेही त्यांनी शेवटी सांगितले

# गेवराईतील तिरुपती हॉस्पिटल येथे डायलिसिस युनिटचा शुभारंभ

**आता सर्वसामान्यांना डायलिसिस करण्यासाठीची गैरसोय होणार दूर**
**महात्मा ज्योतिबा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत होणार उपचार**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : एखाद्या व्यक्तीची किडनी निकामी ठरल्यानंतर त्या रुग्णाला वाचविण्यासाठी डायलिसिस हा पर्याय उत्तम ठरतो. मशीनद्वारे रुग्णांच्या रक्तातील अशुद्ध घटक बाहेर फेकून शुद्ध रक्त शरीरात पुरविले जाते. ही मशीन किडनीसारखेच कृत्रिमरीत्या काम करते. किडनीग्रस्त रुग्ण हा डायलिसिस उपचार घेऊन १५ वर्षा पेक्षा जास्त काळ जगू शकतो. अशाच डायलिसिसची गरज असलेल्या सामान्य रुग्णांना आता बीड किंवा छत्रपती संभाजी नगर येथे जाण्याची गरज नाही गेवराई शहरातील डॉक्टर गोविंद लेंडगुळे यांच्या तिरुपती हॉस्पिटल येथे

रुग्णालयांमध्ये डायलिसिस सेंटर्स उभारले आहे. दि.२०.०१.२०२५ वार




सोमवार रोजी गेवराई येथील प्रसिद्ध डॉ. विजय कुमार सिकची यांच्या हस्ते डायलिसिस युनिटचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बालाजी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉक्टर गोविंद लेंडगुळे व डॉ. गायत्री लेंडगुळे यांच्या सह तिरुपती हॉस्पिटल येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते.सर्वसामान्यांच्या सेवेसाठी या ठिकाणी

डायलिसिस करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले,प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ही सुविधा करण्यात येणार आहे.अशी माहिती बालाजी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉक्टर गोविंद लेंडगुळे व डॉ. गायत्री लेंडगुळे यांनी दिली आहे.

# नांदेडमध्ये प्रथमच हिमोफिलिया रुग्णांसाठी मोफत फॅक्टर डिस्ट्रीब्युशन आणि फिजिओथेरपी कॅम्प रुग्णांना दिलासा

नांदेड येथे हिमोफिलिया रुग्णांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि अभूतपूर्व उपक्रम राबवण्यात आला. इंटास फाउंडेशन आणि हिमोफिलिया डे केअर सेंटरच्या संयुक्त विद्यमाने एस. जी. जी. एस. सिव्हिल हॉस्पिटल येथे मोफत फॅक्टर डिस्ट्रीब्युशन आणि फिजिओथेरपी कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा लाभ सुमारे ७५ रुग्णांना मिळाला, ज्यांना मोफत फॅक्टर ८ पुरवण्यात आला. हा उपक्रम रुग्णांसाठी एक मोठा दिलासा ठरला असून, त्यांच्या उपचारात आणि पुनर्वसन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.




हिमोफिलिया हा रक्तस्त्रावाशी संबंधित एक गंभीर आजार असून, रक्त गोठवणाऱ्या घटकांची कमतरता असल्यामुळे किरकोळ जखमही गंभीर स्वरूप धारण करू शकते. उपचारासाठी लागणारे फॅक्टर ८ आणि फॅक्टर ९ हे औषध अत्यंत महाग असल्याने अनेक रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत. अशा परिस्थितीत इंटास फाउंडेशनने पुढाकार घेत रुग्णांना मोफत फॅक्टर उपलब्ध करून देण्याचा सामाजिक बांधिलकीतून महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

कॅम्पमध्ये फिजिओथेरपीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. सुमेध वाघमारे यांनी फिजिओथेरपीच्या सहाय्याने हिमोफिलिया रुग्णांचे सांधेदुखी आणि स्नायूंच्या समस्यांवरील उपाय स्पष्ट केले. त्यांनी रुग्णांना योग्य प्रकारचे व्यायाम, पुनर्वसनासाठी आवश्यक हालचाली आणि नियमित सवयींबाबत मार्गदर्शन केले. हा उपक्रम केवळ उपचारापुरता मर्यादित न राहता, रुग्णांचे संपूर्ण जीवनमान सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.या कार्यक्रमात इंटास फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक श्री. सुरज माळी, प्रविणा गेडम, भक्ति केळगणे, तसेच नांदेडचे आमदार मा. बेदरकार, सिव्हिल सर्जन डॉ. भोसेकर, आणि हिमोफिलिया सोसायटीचे श्री. लक्ष्मीकांत जाधव यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे हा कॅम्प यशस्वीपणे पार पडला.रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांनी इंटास फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत, भविष्यात असे उपक्रम वारंवार आयोजित करण्याची मागणी केली. या मोहिमेमुळे हिमोफिलिया रुग्णांना नवा आत्मविश्वास मिळाला असून, त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. हा उपक्रम सामाजिक जबाबदारीचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे, ज्यामुळे नांदेड जिल्ह्यातील अनेक गरजू रुग्णांना आधार मिळाला आहे.

# अंगणवाडीच्या विद्यार्थिनीचे शाळेच्या कार्यक्रमात नृत्य
# चिंचोटीच्या शाळेत समृद्धीने केला उत्तम डान्स

वडवणी (प्रतिनिधी)

तालुक्यातील चिंचोटी जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.. या कार्यक्रमात गावातील अंगणवाडी मध्ये जाणारी चिमुकली कु. समृद्धी अशोक फपाळ या चार वर्षीय बालिकेने खूप सुंदर नृत्य सादर केले. तीचे या नृत्य पाहून शाळेतील सर्व शिक्षक आणि गावकऱ्यांनी तोंडभर कौतुक करीत टाळ्यांचा एकच कडकडाट केला.

चिंचोटी शाळेत दरवर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केलेलं असतं. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेच्या वतीने विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात जिल्हा परिषद चिंचोटी शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी एकाहून एक असे कार्यक्रम सादर केले. शाळेच्या सर्व शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. मात्र याच कार्यक्रमात चिंचोटी येथील अंगणवाडीत शिक्षण घेणारी चार वर्षीय चिमुकली दाखल झाली. कु. समृद्धी अशोक फपाळ या चिमुकल्या बालिकेने आम्ही शिवकन्या या गीतावर सुंदर नृत्य केलं. छत्रपती शिवरायांची मी कन्या आहे आम्ही जिजाऊची लेक आहोत, आम्ही झाशीच्या राणी आहोत, अशा या गीताचा संदेश देत हातामध्ये भगवा झेंडा घेऊन मुलींनी स्वसंरक्षणाचा असा बोध या गीतातून देत भगव्या झेंड्यावर आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीला जागृत करणारे नृत्य चिमुकल्या समृद्धीने सादर केलं. हे नृत्य पाहून शाळेतील सर्व शिक्षक आणि कार्यक्रम पाहण्यासाठी गावातून आलेल्या प्रेक्षक गावकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून तिचं कौतुक केलं. एवढ्या छोट्या वयात तिने केलेले नृत्य पाहून



सर्वांनी कौतुक केलं. भावी काळात एक सुंदर नृत्यांगना होऊ शकते अशा शुभेच्छा तिला शाळेच्या शिक्षकांनी दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय नांदे, सहशिक्षक गोवर्धन राऊत, तात्याराव गडदे, बापू धनवे, आशिष इंगळे, महेश घोळवे, संतोष देवकते, रमेश भोज, लक्ष्मीबाई गोंडे यांच्यासह गावातील सरपंच भागवत गोंडे, उपसरपंच गोविंद गोंडे, चेअरमन महादेव गोंडे, ज्येष्ठ पत्रकार रामेश्वर गोंडे, अशोक गोंडे, मुरली येळवे, चित्रपट दिग्दर्शक प्रा श्रीनिवास काकडे, दत्ता गोंडे, शालेय समितीचे अध्यक्ष सुसेन मायकर, उपाध्यक्ष सोनाजी गोंडे, शिक्षण प्रेमी नागरिक दिनकर गोंडे, समाधान काकडे, विनोद काकडे, रामचंद्र बादाडे, ग्रामपंचायत सदस्य साहेबराव गोंडे यांच्यासह गावातील सर्व नागरिकांनी तिला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

गीताच्या निवडीबद्दल आई-वडिलांचे कौतुक.. चित्रपटातील धांगडधिंगा गीतावर नृत्य करण्यापेक्षा आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि महाराष्ट्रातील महापुरुष यांच्या विचाराला अभिवादन करणार हे गीत एका चिमुकलीसाठी निवडता आलं तिच्या या गीताच्या निवडीबद्दल तिचे वडील अशोक फपाळ आणि आई प्रतिभा फपाळ यांचेही उपस्थितांनी तोंड भरून कौतुक केलं

सहशिक्षक इंगळे सर यांचे परिश्रम... चिंचोटी जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक आशिष इंगळे सर यांनी मागील अनेक दिवसांपासून शाळेतील विद्यार्थ्यांना कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी परिश्रम घेतले कार्यक्रमातील सर्व नियोजन आणि विद्यार्थ्यांचे नृत्य देखील त्यांनीच बसवले त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

## जाहिर प्रगटन

**(संरक्षित कुळाची नोंद कमी करणेबाबत जाहिरनामा)**
**तहसिलदार वडवणी, ता. वडवणी जि.बीड यांचे न्यायालयात**
**स.कुळ न.४८/२०२३**

ज्या अर्थी गणेश भरतराव अंबुरे वय वर्ष, धंदा शेती, रा.खळवट लिमगांव ता. वडवणी जि.बीड यांनी स.न.ग.न.७५/आ शिवार खळवट लिमगांव ता. वडवणी या गटातील इतर हक्कातील स.कु.ज्ञानोबा आश्रुबा ही नोंद कमी करणेबाबत अर्ज दिलेला आहे.त्या अथी स.कुळ स.कु.ज्ञानोबा आश्रुबा वय, धंदा, राहणार या बाबत माहिती दिलेली नाही. यांच्या नांवे जमिन स.न.ग.न.७५/आ मध्ये ७/१२ पत्रकाला इतर अधिकारात संरक्षित कुळाची बेदखल नोंद आहे. सदरची नोंद कमी करणेबाबत सदर अर्ज दाखल झालेला आहे.

त्या अर्थी स.कुळ स.कु. ज्ञानोबा आश्रुबा हे किंवा त्यांचे वारस जे कोणी असतील त्यांनी या जाहिर प्रगटनाच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाचे आत या न्यायालयात सदर कुळाबाबत आपले म्हणणे तसेच आपल्या हरकती पुराव्याच्या प्रतीसह कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यांत येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावे, हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदाराचे मालकी हक्काबाबत लागलीच पुरावा घेवुन, त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास सदर ७/१२ पत्रकावरील स. कुळाची नोंद कमी करण्यात येईल, असा आदेश पारित केला जाईल.

आवश्यकता :- मौ. खळवट लिमगांव ता.वडवणी जि.बीड स. कुळ ज्ञानोबा आश्रुबा हे महसुल अभिलेखात

सं. कु. कुळाची नोंद कमी करणेसाठी

आज तारीख १५/०१/२०२५ रोजी आमचे सही व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

तहसिलमध्ये नेमलेली तारीख ३१/०१/२०२५

**तहसिलदार**
**वडवणी**

# पालकमंत्री आले अन पोलीस प्रशासनाने लावले समाज कल्याण विभागाला कुलूप

## सर्वसामान्य जनता व विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचे काम पालकमंत्र्यांनी केले




बीड (प्रतिनिधी)

जिल्हाधिकारी परिसरामध्ये पोलीस प्रशासनाने दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये डी.पी.डी.सी ची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय बीड या ठिकाणी आयोजित केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर व समाज कल्याण विभागाचा परिसर हा वेगळा आहे परंतु या ठिकाणी पोलीस प्रशासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी गेट बंद करत कुलूप लावले आहे त्या ठिकाणी समाज कल्याण विभागामध्ये अनुसूचित जातीचे लाभार्थी, स्कॉलरशिप व स्वाधार योजनेसाठी फॉर्म घेऊन येणारे विद्यार्थी यांना समाज कल्याण विभागाच्या परिसरामध्ये येण्यापासून जाणीवपूर्वक मज्जाव केला जात आहे.तसेच समाजकल्याण विभागाची भिंत पाडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे करण्यात आलेला रस्ता हा वीट बांधकाम करून तात्काळ बंद करण्यात यावा. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जाण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील परिसरामध्ये स्वतंत्र रस्त्याची व्यवस्था करण्यात आलेली असताना जाणीवपूर्वक समाज कल्याण विभाग या ठिकाणाहून वाहतूक करत असल्याचे दिसून येते. जिल्हाधिकारी कार्यालय व समाज कल्याण विभाग बीड या दोन्हीचा परिसर वेगवेगळा असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकानच्या गेटला कुलूप लावण्याचा प्रश्न उद्भवत नाही यापुढे डीपीडीसीची बैठक आयोजित करत असताना समाज कल्याण विभागामध्ये येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची दखल पोलीस प्रशासनाने घ्यावी.

अजय सरवदे
जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

# बीड व अहमदनगर जिल्ह्यात दहशत माजवणाऱ्या
# वाळू माफियाची हर्सूल कारागृहात रवानगी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्याची धुरा सांभाळल्या पासून शर्तीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्ह्यातील गुंडागिरीचे व गुन्हेगारीचे तसेच अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून एम.पी.डी.ए कायद्यांतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडांवर कारवाई करण्याचे योजिले आहे. त्या अनुषंगाने चकलांबा सपोनी यांनी दि.०३-०९-२०२४ रोजी इसम नामे अक्षय विठ्ठल ढाकणे (वय ३०) वर्ष रा. मुंगी ता. शेवगाव जि. अहमदनगर यांच्याविरुद्ध एम.पी.डी.ए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्या मार्फतीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला होता. सदर स्थानबद्ध इस्माविरुद्ध अहमदनगर व बीड जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा टाकणे, जाळपोळ करणे, गौण खनिज वाळू चोरी करणे, सरकारी कामात अडथळा आणणे, सरकारी नोकरावर हल्ला करणे, मारहाण करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, अशा गंभीर स्वरूपाची एकूण १० गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हे शरीराविरुद्धचे व मालाविरूद्धचे गंभीर गुन्हे करून गोदावरी नदी पात्रातील वाळू गौण खनिज याची चोरी करून साठा करून बड्या भावाने विक्री करत असल्याने पोलिसांची त्यांच्यावर बऱ्याच दिवसापासून करडी नजर होती. तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधरावे म्हणून यापूर्वी लीलि ११० प्रमाणे दोन वेळा प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम प्रतिबंधक कारवाईत न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने वाळू गौण खनिज चोरीचे गुन्हे करण्याचे चालूच ठेवून होता. त्याची तलवाडा, चकलांबा, गेवराई व नगर जिल्ह्यातील शेवगाव, पाथर्डी तालुक्यात दहशत आहे. त्याच्या विरुद्ध सर्वसामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना व शेतकऱ्यांना त्रास देऊन दहशत निर्माण करून वाळू चोरीचे गुन्हे करत होता.सदर प्रकरणात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दि.१९-०९-२०२४ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए कायद्याअंतर्गत आदेश पारित करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेऊन हर्सूल कारागृह व छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबद्ध करणे याबाबत आदेश पारित केले होते.



त्यानंतर पोलीस अधीक्षक यांनी सदर इसमाज तात्काळ ताब्यात घेऊन कारवाई करण्याच्या सूचना चकलांबा पोलीस ठाण्याचे सपोनि व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांना दिले होते. तेव्हापासून चकलांबा पोलीस स्टेशनचे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नमुद इसमाचा शोध घेत होते. तो फरार झालेला असल्याने मिळून येत नव्हता व अटक टाळण्यासाठी स्वतःचे अस्तित्व लपून वावरत होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी गोपनीय बातमीच्या आधारे नमूद प्रस्तावित स्थानबद्ध दि.२९-०१-२०२५ रोजी बालमटाकळी ता. शेवगाव परिसरातून सायंकाळी ६.३० वाजता अभ्यास घेतली असून चकलांबा पोलीस स्टेशन येथे हजर केले आहे. चकलांबा पोलीस स्टेशन येथे सदर इसमास कायदेशीररित्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सूल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबद्ध करण्याची प्रक्रिया चालू आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत अपोअ सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्यासह सपोउपनि अभिमन्यू औताडे, संजय जायभाये, पोना गणेश हंगे नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा यांनी केलेली आहे.

# माजी पालकमंत्री धनंजय मुंडेनीं मागासवर्गीयांच वाटोळं केलं – ॲड विकास जोगदंड

बीड (प्रतिनिधी) २९ जानेवारी लोकप्रितनिधी हे सर्वसामान्यांचे अडीअडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी सर्वसामान्यांनी निवडून दिलेले असतात त्यांनी सेवेकरी म्हणून जनसामान्यांची सेवाच केली पाहिजे मालक होऊन आपले बस्थान बसविणाऱ्यांना योग्य वेळी मायबाप जनता जनार्दन जागा दाखवते सत्ता आणि सत्तेतून भ्रष्ट मार्गाने अमाप पैसा आणि संपतीचा संचय करत सत्तेचा दुरुपयोग कसा करावा याचे प्रमाण अन्न नागरी पुरवठा मंत्री तथा बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले असून बीड जिल्हा विकासापासून लाखो मैल दूर नेला आहे जिल्हा वार्षिक योजनेतील प्रत्येक योजनेखाली येणाऱ्या निधीती स्वतः ची मक्तेदारी असल्यागत स्वहित करण्यातच मुंडे यांनी धन्यता मानली आहे महाराष्ट्र राज्यातील नागरी क्षेत्रातील विशेष घटक लोकसंख्येच्या कल्याणासाठी राबवण्यात येणाऱ्या नागरी वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणी करिता अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा जसे की पाणी, मलनिसारण,जोड रस्ते, अंतर्गत रस्ते,समाज मंदिर,वाचनालय, व्यायाम शाळा,उद्यान सह आदी विकास कामे अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्तीचा सर्वांगीण विकास करणे साठी कोट्यावधी रु निधी शासनाकडून येतो परंतु निधी खर्च करण्याचे सर्वस्व अधिकार पालकमंत्री महोदयानां असल्याने माजी पालकमंत्री तथा अन्न नागरी पुरवठा संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी राखीव प्रभागाच्या वाट्यास त्यांचे कार्यकाळात कायम उपेक्षा आणली असून राखीव प्रभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संदस्यांना निधी साठी मोठा संघर्ष करावा लागला आहे याचे उदाहरण द्यायचे झाले तर २०२४-२५ या वर्षी चे देता येईल लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी प्राप्त होऊन देखील जाणीवपूर्वक अनुसूचित जातींच्या वस्त्यांचे अहित करून व्यापाऱ्यांचे हित लक्षात घेत एकूण राखीव ६ प्रभागा पैकी केवळ प्रभाग क्र २ या एकाच प्रभागा मधील कामे ही अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांना सामूहिक लाभ होईल अशी सार्वजनिक हिताची



व आवश्यक नसतांना देखील ४ कोटी २० लाख रुपये इतका निधी नियम बाह्ययपणे दिला आहे हा एकप्रकारे राखीव प्रभागवर माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अन्याय केला असून राखीव प्रभागाच्या विकासाला अडथळा आणत धनंजय मुंडे यांनी मागासवर्गीयांचे वाटोळे केले असल्याचा आरोप भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक /अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकातून केला आहे यावर्षीच्या निधीतून १ रु निधी देखील राखीव प्रभाग वगळता इतरत्र खर्च करू देणार नाही या साठी लोकशाही मार्गाने आपण लढत राहणार असल्याचे ही ड विकास जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकातून सांगितले आहे.



बीड़ जिल्हा वकील संघाचे सदस्य ड. असलम आरेफ (शाफे) यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना बीड़ जिल्हा वकील संघाचे सदस्य ड. शेख शाहजेब, ड. सय्यद मीनहाजोद्दीन, ड. शेख बिलाल, ड. शेख सोहेल, ड. शेख वासिम, ड. खालेख पठाण, ड. समीर शेख, ड. शेख आसेफ, ड. नदीम पठाण व इत्यादि दिसत आहे.


# डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यस्तरीय मेळाव्यास उपस्थित रहावे – दिनकर शिंदे

सेलु येथे पुरस्कार वितरण सोहळा

गेवराई (प्रतिनिधी)

मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार व परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्यासह राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्यातील आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघांना यथोचित सन्मान करून राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविले जाणार आहे. या वर्षी परभणी जिल्ह्यातल्या सेलू या तालुका ठिकाणच्या शहरामध्ये हा भव्य एकदिवसीय सोहळा येत्या दि १ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. राज्यभरातुन मुक्कामी येणाऱ्या पत्रकार बांधवांच्या निवासस्थानाची व भोजनाची व्यवस्था सेलु तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे. या राज्यस्तरीय मेळाव्यास बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.





## कोरडे गणपती मंदिरात महागणेशयाग व महाप्रसाद

बीड/प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे बीड शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळे गल्ली येथील श्री संस्थान कोरडे गणपती मंदिर या ठिकाणी आज ३१ जानेवारी शुक्रवार रोजी सामुदायिक महा गणेशयाग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच दिनांक १ फेब्रुवारी शनिवार रोजी श्रींची पारंपारिक मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे या दोन्ही कार्यक्रमासाठी भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे

बीड शहरातील ग्रामदैवत म्हणून समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र कोरडे गणपती संस्थान दरवर्षी द्वार निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करत आहे यावर्षी देखील शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी रोजी सामुदायिक महा गणेशा याग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या वेळेत श्रींची आरती करून महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच दिनांक १ फेब्रुवारी रोजी प्रतिवर्षाप्रमाणे श्रींची पारंपरिक मिरवणूक शहरातून काढली जाणार आहे या मिरवणुकीसाठी दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात या वर्षी देखील भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे,श्रगणेशाची मिरवणूक काळे गल्ली, जुना बाजार, बलभीम चौक, कारंजा जुनी भाजी मंडई, कबाड गल्ली, माळीवेस, धोंडीपुरा मार्गे पुन्हा मंदिरात येऊन आरती केली जाणार आहे

**टी.सी.हरवला आहे**

**रुक्मानंद उद्धवराव नवले**

नावाचा इयत्ता दहावी पासचा टि.सी. गेवराई– रुई प्रवासादरम्यान हरवला आहे.

सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा

मो.नं ९८२२७४९२७९

# अजितदादा बीडची बारामती करा;शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी ज्ञानमंदिरांना भरीव निधी द्या ; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

अजितदादा बीडची बारामती करा, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांसाठी ज्ञानमंदिरांना निधी द्या.बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत तर ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे तसेच जिल्हा परिषदेच्या ईमारत नसलेल्या ६३ वस्तिशाळांना ईमारत निधी, १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे.तसेच जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत आहे त्यामुळे दुरावस्थेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यात भरीव निधी देण्यात यावा यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि.३० गुरुवार रोजी धरणे आंदोलन करण्यात येऊन ना.अजितजी पवार,ना. धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे , आ. प्रकाशदादा सोळंके,आ.सुरेश धस,आ.विजयसिंह पंडित,आ.संदिप क्षीरसागर, आ.नमिता मुंदडा, यांना निवेदन देण्यात आले आहे.आंदोलनात शेख युनुस,रामनाथ खोड, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक,पांडुरंग हराळे,बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप माजी सैनिक अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना नितीन सोनवणे, शहराध्यक्ष राजेश वडमारे आदी सहभागी होते.

मोडकळीस आलेल्या शाळांच्या पुनर्बांधणी व शाळा खोल्यांच्या दुरूस्तीसाठी निधी द्यावा

बीड जिल्ह्यामध्ये शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक सादिल – २०२१/प्र.क्र.१०१/एसएम –४, मंत्रालय मुंबई दि.०९.०९.२०२१ नुसार राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत मराठवाड्यातील निजाम कालीन जुन्या व मोडकळीस आलेल्या शाळांच्या वर्गखोल्या दुरूस्ती व पुनर्बांधणीकरीता बीड जिल्ह्यामध्ये २१७ शाळांमधील ३५२ वर्गखोल्या बांधकामासाठी रूपये ३२९१.२० लक्ष व १७२ शाळांमधील वर्गखोल्या दुरूस्तीसाठी ४०४.१५०लक्ष असे एकुण ३६९५.३५ लक्ष निधी मंजूर झालेला असुन वरील नमूद शासन निर्णयानुसार सदरील मंजूर रकमेपैकी ८० रक्कम शासन स्तरावरून प्राप्त होणार असुन १०टक्के रक्कम संबंधित जिल्हापरीषदेने त्यांच्या शेष फंडातून/१५ वा वित्त आयोग/जिल्हा नियोजन समिती/आमदार निधी/खासदार निधी/मानव विकास मिशन इत्यादी पैकी तरतुदीतुन व उर्वरीत १० टक्के निधी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक लोक वर्गणीतून किंवा सी.एस.आर.(उडठ र्षीपव ) रोख किंवा वस्तू स्वरूपात उपलब्ध करून द्यायचा आहे.उपरोक्त मंजूर निधी पैकी शासन स्तरावरून प्राप्त होणा-या ८०% निधी पैकी रूपये १६९९.८६ लक्ष निधी मार्च २०२२ मध्ये प्राप्त झालेला आहे.

शिक्षण आयुक्त पुणे व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी घेतलेल्या आढावा बैठकीतील सुचनेनुसार १५ लक्ष पर्यंतची कामे ग्रामपंचायत मार्फत व १५ लक्ष रकमेपेक्षा जास्त रकमेची कामे इ निवेदने द्वारे करण्याबाबत माहे आगस्ट २०२२ मध्ये निर्णय घेण्यात आला.त्यानुसार पहिल्या टप्प्यात १५ लक्ष पेक्षा कमी रकमेच्या असलेल्या ग्रामपंचायत मार्फत करावयाच्या ११२ शाळांमधील ११२ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी रूपये १०३०.४० लक्ष व १४२ शाळांमधील वर्गखोल्या दुरूस्तीसाठी रूपये ३३५.७० लक्ष च्या कामास दि.१८.०९.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत.व सदरील कामे प्रगतीपथावर आहेत.तसेच १५ लाखांपेक्षा जास्त रकमेच्या ८५ शाळांमधील २०९ वर्ग खोली बांधकामाच्या रुपये १९५८.००लक्ष कामास माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रशासकीय मंजुरी देऊन सदरील कामाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत.

तसेच जिल्हा नियोजन समिती मधुन सन २०२२-२३ मध्ये ७६ प्राथमिक शाळांमध्ये ८९ वर्गखोली बांधकामासाठी ८८९ लक्ष व




१५६ शाळांमधील दुरूस्ती साठी ६७२.२७ लक्ष व माध्यमिक ४ शाळांच्या दुरूस्ती साठी ६५ लक्ष व २१ शाळांमधील वर्गखोल्या बांधकामासाठी २१३ लक्ष असे एकुण १८३९.२७ च्या कामांसाठी माहे मार्च २०२३ मध्ये प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.सदरील कामे लवकरात लवकर सुरू करण्यात येतील .या व्यतिरिक्त आवश्यक असणा-या शाळांमधील वर्गखोल्या बांधकामासाठी व दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समिती, महाराष्ट्र शिक्षण परीषद मुंबई यांच्याकडे सन २०२३-२४ मधील आराखड्यामध्ये मागणी करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषदेच्या ६३ वस्तिशाळांना स्वतःची इमारत नाही त्यासाठी निधी द्यावा

बीड जिल्ह्यातील एकुण ९८ वस्तिशाळांना स्वतःची ईमारत नसल्याने गेल्या १३ वर्षांपासून झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये अथवा किरायाच्या घरात भरविण्यात येत असुन गेल्या २ वर्षात ३५ वस्तिशाळांच्या इमारतीसाठी निधी मंजूर झाला असुन उर्वरित ६३ वस्तिशाळांच्या इमारतीसाठी निधी देण्यात यावा.

जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असुन त्यासाठी निधी द्यावा

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१६४ शाळांपैकी ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव असुन विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असुन त्यासाठी निधी देण्यात यावा.

जिल्हा परिषदेच्या २४८० शाळांपैकी १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असुन डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन निधी द्यावा

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४८० शाळांपैकी ७७२ शाळांना वीज पुरवठाच करण्यात आलेला नाही तर ६२० शाळांमधील वीजपुरवठा महावितरण कर्मचाऱ्यांनी वीज देयके थकीत असल्याने वीज पुरवठा खंडित करून मीटर काढून नेले आहे.तब्बल १३९२ शाळांमधील विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर ,स्मार्ट टीव्ही ,डिजिटल बोर्ड ,एलईडी आदी उपकरणे व साहित्य धुळखात पडुन असून एकंदरीतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यच अंधारात आहे. त्यामुळे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन वीज देयके व इतर कारणांसाठी निधीची तरतूद करण्यात यावी.

# राज्य सरकारने जरांगे पाटील यांच्या तत्काळ मागण्या मान्य करुण उपोषण सोडावे

## सकल मराठा समाजाकडून तहसीलदार यांना निवेदन

धारूर / प्रतिनिधि

गेल्या पाच दिवसांपासून विविध मागण्यांसाठी संघर्ष योद्धा जरांगे पाटील अंतरवली या ठिकाणी उपोषणास बसले आहेत त्यांची प्रकृती अतिशय खालावली आहे मात्र राज्य सरकार याकडे गंभीरतेने घेत नसल्याचे दिसून येत आहे उ दृष्टीने धारूर सकल मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटील यांच्या



तात्काळ मागण्या मान्य करून उपोषण सोडवावे असे निवेदन सकल मराठा समाज किल्लेधारूर यांच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले.

मनोज जरांगे पाटील विविध मागण्यांसाठी माघील पाच दिवसांपासून उपोषणास बसले आहेत मात्र याकडे राज्य सरकार लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे.या दृष्टीने धारूर सकल मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटील यांच्या आठ मुख्य मागण्या तात्काळ राज्य सरकारने मान्य करून जरांगे पाटील यांचे उपोषण सोडावे अन्यथा पुढील काही दिवसात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असे निवेदन सकल मराठा समाज किल्लेधारूर यांच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले यावेळी राज्य सरकारच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या यावेळी मोठया संख्येने सकल मराठा बांधव उपस्थित होते.

# मनोज जरांगे पाटील यांना काही झाले तर याद राखा !

## जरांगे पाटील काही झाले तर आत्मदहन,अमरण उपोषन करणार - रोहन गलांडे पाटील

केज/प्रतिनिधी

मराठ्यांचे दैवत २५ जानेवारी पासून मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे अमरण उपोषणाला बसले आहेत तरी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या शासनाने मान्य कराव्यात जर २ फेब्रुवारी पर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणार आहे असे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. जर उपोषणा दरम्यान जरांगे पाटील यांना काही झाले तर आत्मदहन करणार तसेच केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणार असे निवेदनाद्वारे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे या विषयी सविस्तर वृत्त निवेदनाद्वारे असे की केज तहसील कार्यालय यांना विनंती करण्यात येते की २५ जानेवारी पासून मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे अमरण उपोषणाला बसले आहेत तरी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या शासनाने मान्य कराव्यात जर २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणे बाबत.तसेच जर उपोषणा दरम्यान जरांगे पाटील यांना काही झाले तर आत्मदहन करणार तसेच केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणार आहे असे निवेदनाद्वारे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

## पालकमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील

# माजलगावच्या भावी आमदार म्हणून मिरवणाऱ्या जयसिंग सोळकेची गाडी पोलिसानी अडवली

## जयसिंह सोळुंखे यांना ओळख सांगण्याची वेळ आली नंतर प्रवेश दिला


बीड (प्रतिनिधी)

धनंजय मुंडे यांच्या विरोधामध्ये प्रकाश सोळंके सुरेश धस यांनी महायुद्ध सरकार मध्ये राहून विरोध केला यांना आजच्या डी पी टी सी बैठकीमध्ये अजित पवार पंकजा मुंडे यांनी गाडीची किंमत दिली नाही यांचा अपमान झाल्याच्या चर्चेला उदान येत असतानाच मात्र माजलगावचे भावी आमदार स्वतःला समजणारे जयसिंग सोळके हे पालकमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यात होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात जाताना सामाजिक न्याय भवनच्या गेटवर पोलिसांनी गाडी अडवून बाजूला घेण्यास भाग पाडले. यानंतर मग त्यांनी ओळख सांगितली आणि पोलिसांनी प्रवेश दिला. पण यामुळे जयसिंग सोळके यांना काम करून ओळखनिर्माण करण्याची गरज असत्त्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे आज बीडच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी ते सकाळीच बीड येथे हेलिकॉप्टरने दाखल झाले.



यावेळी त्यांच्या स्वागतासाठी शेकडो कार्यकर्त्यांनी हेलिपॅड पोलीस ग्राउंडवर मोठी गर्दी केली होती. येथून ताफा सरळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने निघाला या ताफ्यात अनेक चाहने होती. सामाजिक न्याय भवनच्या मेटमधून वाहने जिल्हाधिकारी कार्यालयात जाणार होती. बावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते भाबी आमदार समजणारे जयसिंग सोळंके यांचे वाहन पोलिसांनी अडवून बाजूला घेण्यास भाग पाडले. यानंतर त्यांनी पोलिसांना ओळख सांगितली अन् नंतर त्यांना आत जाण्याची परवानगी दिली. पण जिल्हापरिषद मध्ये सदस्य, सभापती म्हणून त्यांना जनतेची कामे करुन छाप पाडता न आल्याने त्यांची ओळख निर्माण झालेली नाही. त्यांनी आमदारकीचे स्वप्न पहाण्याआधी सर्वसामान्य लोकांची सेवा करुन ओळख निर्माण करण्याची गरज असून, सोळंके यातून बाहेर पडून काम करुन ओळख निर्माण करण्याची गरज असल्याची बेथे चर्चा सुरू झाली आहे.

# जुन्या पंचायत समितीतील स्वातंत्र्य सैनिकांचा स्मृती स्तंभ नवीन कार्यालयात उभारा - जवाहरलाल सारडा



## स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांकडे रास्त मागणी

बीड (प्रतिनिधी)

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात बलीदान दिलेल्या हुतात्मा झालेल्या, कारावास भोगलेल्या क्रांतीकारकांच्या स्मृती कायम भारतीय जनतेच्या स्मरणात राहण्यासाठी आणि जनतेस देशप्रेमाची प्रेरणा मिळणेसाठी महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्हयात, तालुक्यात स्वातंत्र्य सैनिकांचे स्मृतीस्तंभ उभारले आहेत. स्मृती स्तंभाची देखभाल व दुरुस्तीचे काम त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्था पंचायत समिती, नगर परिषद, महानगरपालिका, यांच्याकडे सोपविलेले आहे. मात्र दुर्दैवाने सदर स्थानिक संस्था स्मृती स्तंभाची देखभाल दुरुस्ती करत नाहीत. बीडच्या जुन्या पंचायत समितीमध्ये जो स्मृतिस्तंभ उभारण्यात आलेला आहे तो नव्या इमारतीमध्ये नव्याने दिमाखाने उभारणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाही. याची दखल घेऊन जिल्हाधिकारी यांनी पालकमंत्र्यांना ही बाब सांगून तात्काळ नव्या पंचायत समितीच्या इमारतीमध्ये स्वातंत्र्यसैनिकांचा स्मृतीस्तंभ उभारण्यास डीपीडीसी मध्ये मंजुरी द्यावी अशी मागणी स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी पाल्य संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जुन्या पंचायत समिती कार्यालय, बीड येथील सदर जुना स्मृती स्तंभ हा नवीन कार्यालयात नव्याने उभारण्यात यावा व त्याची दरवर्षी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन व १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी देखभाल, दुरुस्ती व सुशोभिकरण करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय स्वातंत्र्य सैनिक उत्तर अधिकारी संघटनाचे अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक पाल्य जवाहरलाल सारडा, संघटनेचे सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष जयप्रकाश कैवाडे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



## राज्य सरकारने जरांगे पाटील यांच्या तत्काळ मागण्या मान्य करून उपोषण सोडवावे

# धारूर तहसीलदारांना निवेदन

किल्लेधारूर /प्रतिनिधी

गेल्या पाच दिवसांपासून विविध मागण्यांसाठी संघर्ष योद्धा जरांगे पाटील अंतरवली या ठिकाणी उपोषणास बसले आहेत त्यांची प्रकृती अतिशय खालावली आहे मात्र राज्य सरकार याकडे गंभीरतेने घेत नसल्याचे दिसून येत आहे उ दृष्टीने किल्लेधारूर सकल मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटील यांच्या तात्काळ मागण्या मान्य करून उपोषण सोडवावे असे निवेदन सकल मराठा समाज किल्लेधारूर यांच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले.

मनोज जरांगे पाटील विविध मागण्यांसाठी माघील पाच दिवसांपासून उपोषणास बसले आहेत मात्र याकडे राज्य सरकार लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे.या दृष्टीने धारूर सकल मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटील यांच्या आठ मुख्य मागण्या तात्काळ राज्य सरकारने मान्य करून जरांगे पाटील यांचे उपोषण सोडावे अन्यथा पुढील काही दिवसात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असे निवेदन सकल मराठा समाज किल्लेधारूर यांच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले यावेळी राज्य सरकारच्या निषेधाच्या घोषणा

# श्री.छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून यशाचा मंत्र शिवतंत्र प्रेरणादायी व्याख्यान, सादरकर्ते शिवशाहीर डॉ. विजय महाराज तनपुरे

## शुक्रवार रोजी शिवशाहीर डॉ. विजय महाराज तनपुरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन; व्याख्यानाच्या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-ह.भ.प. केशव महाराज शास्त्री

केज/प्रतिनिधी

**श्री.छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून यशाचा मंत्र शिवतंत्र प्रेरणादायी व्याख्यान, सादरकर्ते शिवशाहीर डॉ. विजय महाराज तनपुरे,शुक्रवार रोजी शिवशाहीर डॉ. विजय महाराज तनपुरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला केज शहरासह तालुक्यातील व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ह.भ.प. केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण भक्त परिवार केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, वार शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३-३० ते ५-३० वा. कार्यक्रमाचे ठिकाण भागवत कथा मंडप, पंचायत समिती मैदान केज येथे



श्री छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून यशाचा मंत्र प्रेरणादायी व्याख्यान यशाचा मंत्र शिवतंत्र सादरकर्ते शिवशाहीर डॉ. विजय महाराज तनपुरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजक भगवान श्रीकृष्ण आश्रमाचे संस्थापक अध्यक्ष भागवत भूषण ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण भक्त परिवार केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शिवशाहीर डॉ. महाराज तनपुरे रा. श्रीरामपूर पो. ता. राहुरी जि.अहमदनगर त्यांचा जन्म दिनांक २५ डिसेंबर ११९७२ रोजी आहे त्यांचे शिक्षण बी.ए. झाले आहे. त्यांचे वडील माजी सैनिक, वयाच्या दुसऱ्या वर्षी पोलिओमुळे अपंगत्व आले, आजवर हजारोच्या वर पोवाडे, व्याख्याने, हरी कीर्तनाचे जाहीर कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, दिल्ली, हैदराबाद अशा अनेक राज्यांमध्ये महाराजांचे चरित्र घराघरांमध्ये पोहोचविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहिले आहेत.

त्याचबरोबर परदेशात काँगो, अखाती देश, दुबई यासह आफ्रिका यासारख्या देशात सात दिवस शिवचरित्र व अध्यात्म यांचा मिलाप करून निर्माण झालेल्या आपल्या राजांचे शिवायण सादर करणारे महाराष्ट्रातील कीर्तनकार महाराज, अपंगत्वावर मात करत महाराष्ट्रा सह परदेशात ही शिव छत्रपतींचा तेजस्वी इतिहास पोचविणारे शिवशाहीर आगामी पुढील ५ वर्षात ४५ देशात कार्यक्रम, मागील दोन वर्षांपूर्वी दिल्ली युनिव्हर्सिटी कडून शाहिरी क्षेत्रात मानद डॉक्टरेट, महाराष्ट्रातील अनेक दिग्गजांच्या हस्ते अनेक महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त, हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या अतिशय जवळचे शिवशाहीर तब्बल ४९ वेळा मातोश्रीवर भेट, यासह अनेक उल्लेखनीय कामगिरी करत आहेत त्याचबरोबर कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक दिव्यांगांना कुबड्या, तीन चाकी सायकल तसेच गरज उपयोगी वस्तूचे स्वखर्चातून वाटप करत आले आहेत. कष्ट करा, अपेक्षे शिवाय जीवन जगा, अपयशावर मात करा यश तुमचेच आहे असा मोलाचा मंत्र देणारे शिवशाहीर डॉ. विजय महाराज तनपुरे यांचा थोडक्यात परिचय आहे.

या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला केज शहरासह तालुक्यातील व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे शासनाने दखल घ्यावी;धारूर तालुक्यातील सकल गरजवंत मराठा समाजाची मागणी

किल्ले धारूर/प्रतिनिधी

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण द्यावे म्हणुन मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण करत आहेत मा. मनोज दादा यांच्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ धारूर तालुक्यातील सकल गरजवंत मराठा समाजाने प्रशासनाकडे निवेदन दिले आहे. गेल्या पाच दिवसांपासून जरांगे पाटील अंतरवाली सराटीत उपोषणास बसले आहेत, ज्यांचे उपोषण सामजिक आणि आरक्षणाच्या मुद्द्यांवर केंद्रित आहे. या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी धारूर तालुक्यातील गरजवंत मराठा समाज एकत्रित आला आहे. गरजवंत सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले सदर निवेदनात महत्त्वाच्या अनेक



मागण्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे. हैदराबाद व सातारा संस्थान गॅझेटिअरची तात्काळ अंमलबजावणी करणे. न्यायमूर्ती शिंदे समितीने कुणबी नोंदी शोधण्यासाठी समितीला एक वर्ष मुदतवाढ द्यावी. सगे-सोयरे अधिसूचनेचे तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. मराठा समाजासाठी एथड आरक्षण रद्द केलेले एथड पुन्हा सुरू करण्यात यावे. मराठा समाजावर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे. महाराष्ट्रातील मराठा समाज हा कुणबी आणि मराठा एकच आहे म्हणून महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासह अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपोषणावर प्रशासनाने तात्काळ विचार न केल्यास, धारूर सकल गरजवंत मराठा समाज शक्तिशाली आंदोलन करण्याची तयारी करत आहे.दि.३१ जानेवारी २०२५ पासून मोर्चे, तहसील कार्यालयासमोरील धरणे आणि इतर संविधानिक पद्धतींचा वापर करून तीव्र आंदोलन सुरू करण्यात येणार आहे, या मराठा आरक्षण आंदोलनात धारूर तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.



श्याम विद्यालय दहिफळ वडमाऊली येथे प्राचार्य गदळे मॅडम यांच्या नेतृत्वाखाली हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला त्यावेळी प्राचार्या मॅडम, कुलकर्णी मॅडम, डॉक्टर जाधवर मॅडम, ठोंबरे आयडी मॅडम, मेहेत्रे मॅडम व परिसरातील शेकडो महिला

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT